# मिरा भाईंदर महानगरपालिका

## "मा. विभागीय पदोन्नती निवड समिती" बैठक दि.31/03/2022 रोजीचे इतिवृत्तांत"

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी (गट-अ) (वेतनश्रेणी S-20 56100-177500) या संवर्गातील पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांना आरोग्य अधिकारी(रुग्णालय/ प्रतिबंधात्मक उपाय)/शहर क्षयरोग अधिकारी/माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ) (वेतनश्रेणी S-23 67700-208700) या संवर्गातील एका पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 54 (1) अन्वये गठीत केलेल्या पदोन्नती निवड समितीची बैठक दि.31/03/2022 रोजी दुपारी 12.00 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्यालय, दुसरा मजला येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी/पदाधिकारी उपस्थित होते.

1. श्री. दिलीप ढोले — आयुक्त तथा अध्यक्ष,
2. श्री. मारुती गायकवाड — उपायुक्त (मुख्यालय) तथा सदस्य सचिव,
3. श्रीम.मंजिरी डिमेलो — प्र.मुख्यलेखापरीक्षक तथा सदस्य,
4. श्री. दिपक खांबीत — कार्यकारी अभियंता तथा मागासवर्गीय प्रतिनिधी,

| | | | |
|---|---|---|---|
| (मारुती गायकवाड)<br>उपायुक्त (मुख्यालय) तथा सदस्य सचिव<br>विभागीय पदोन्नती निवड समिती | (दिपक खांबीत)<br>कार्यकारी अभियंता तथा मागासवर्गीय प्रतिनिधी<br>विभागीय पदोन्नती निवड समिती | (मंजिरी डिमेलो)<br>प्र.मुख्यलेखापरीक्षक तथा सदस्य<br>विभागीय पदोन्नती निवड समिती | (दिलीप ढोले)<br>आयुक्त तथा अध्यक्ष<br>विभागीय पदोन्नती निवड समिती |

**<u>आस्थापना विभागाने सादर केलेला प्रस्ताव :-</u>**

नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि. 26 फेब्रुवारी, 2019 नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास व महानगरपालिकेच्या आकृतीबंधास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि. 28 मे, 2019 व नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि.25 नोव्हेंबर,2021 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 च्या सुधारणेस मान्यता दिल्यानुसार आरोग्य अधिकारी(रुग्णालय/ प्रतिबंधात्मक उपाय)/शहर क्षयरोग अधिकारी/माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ) या संवर्गात पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे अर्हता विहित करण्यात आली आहे.

| सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणुकीची पद्धत व टक्केवारी<br>1. नामनिर्देशन<br>2. पदोन्नती<br>3. प्रतिनियुक्ती | नेमणुकीकरिता अर्हता व नेमणुकीच्या पद्धती |
|---|---|---|---|
| श्रेणी - 01<br>वैद्यकीय सेवा | शहर क्षयरोग अधिकारी | पदोन्नती 50% | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत वैद्यकीय अधिकारी/अपघात वैद्यकीय अधिकारी पदाचा किमान 3 वर्षाचा अनुभव असणाऱ्या व पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या (M.D) अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |

मिरा भाईंदर महानगरपालिका आकृतीबंधानुसार आरोग्य अधिकारी(रुग्णालय/ प्रतिबंधात्मक उपाय)/शहर क्षयरोग अधिकारी/माता व बाल कल्याण अधिकारी या संवर्गातील एकुण 03 पदे मंजूर आहे व मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019 नुसार आरोग्य अधिकारी(रुग्णालय/ प्रतिबंधात्मक उपाय)/शहर क्षयरोग अधिकारी/माता व बाल कल्याण अधिकारी (गट-अ) या संवर्गातील पदे ही 50% नामनिर्देशन/सरळसेवा व 50% पदोन्नतीने भरावयाचे आहे. त्यामुळे रिक्त असलेल्या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याचे प्रस्तावित आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :-एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन-12, दि.01 ऑगस्ट,2019 नुसार शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाहीबाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आलेली आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र.3(3) नुसार विचारक्षेत्रातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची अ.क्र. i) ते Xiii) मधील निकषांच्या आधारे पात्रता तपासणेबाबत नमुद आहे.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे, 2021 नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.2797/2015 या प्रकरणी दि.04/08/2017 रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि.25/05/2004 च्या स्थितीनुसार सेवाजेष्ठतेने भरण्यात यावी असे निर्देश आहेत. तसेच सदर पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन असतील अशी कार्यवाही करताना पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सध्याच्या सेवाजेष्ठता यादीत वरच्या स्थानावर आलेल्या कोणत्याही मागासवर्गीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना पदावनत करण्यात येऊ नये असे निर्देश आहेत.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.दिव्यांग 2015/प्र.क्र.171/16-अ, दि.23 जुलै, 2021 नुसार सर्व आस्थापनांनी गट-अ व गट-ब संवर्गातील पदोन्नतीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.22/07/2021 रोजीच्या निर्णयानुसार दिव्यांग आरक्षणासह पदोन्नतीसाठीची सर्व रिक्त पदे (100%) भरण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी. तसेच अशी कार्यवाही करताना मा.उच्च न्यायालयाच्या दि.22/07/2021 रोजीच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असे निर्देश आहेत.

| अ.क्र. | ज्येष्ठतेनुसार विचार क्षेत्रात येणाऱ्या अधिकाऱ्यांची जाती प्रवर्ग | ज्येष्ठतेनुसार विचारक्षेत्रातील प्रवर्गनिहाय अधिकाऱ्यांची नावे | ज्येष्ठता सूचीतील ज्येष्ठता क्रमांक | जन्म दिनांक व सध्याचे वय | सेवानिवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक अर्हता | सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार पदोन्नती साठी अर्हता प्राप्त आहे/नाही | ज्या पदावरुन पुढील पदावर पदोन्नती देय आहे त्या पदावर एकुण सेवा किती व केव्हापासून | सध्याच्या पदावर जेव्हापासून सलग काम करीत आहे तो दिनांक (त्या पदाचे नाव द्यावे) पदोन्नतीचा मानीव दिनांक दिला असल्यास तो नमूद करावा | वयाच्या 50/55 व्या वर्षी झालेल्या पुनर्विलोकनाचा निर्णय | जातीचे प्रमाणपत्राची वैधता प्राप्त झाली आहे किंवा कसे? | शिस्तभंग विषयक कार्यवाही/प्राथमिक चौकशी चालू आहे/नाही (विस्तृत माहिती जोडपत्र क मध्ये नमूद करावी) | पूर्वी कधीतरी आस्थापना मंडळाने त्यांचा विचार केला होता/नाही असल्यास आ.मं.च्या बैठकीचा दिनांक व सा.प्र.वि.चा संबंधीत पत्रव्यवहार नमूद करावा. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 1. | अनु.जाती | डॉ. चंद्रशेखर कांबळे | 1 | 20/09/1973 48 वर्षे | 31/09/2031 | एम.बी.बी.एस | नाही | 29/05/2007 पासुन (14 वर्षे) | 29/05/2007 पासुन वैद्यकीय अधिकारी | लागु नाही | आहे | जोडपत्र क सोबत जोडले आहे | लागु नाही |
| 2. | खुला | डॉ. प्रमोद पडवळ | 2 | 20/08/1974 47 वर्षे | 31/08/2032 | एम.बी.बी.एस एम.डी | आहे | 29/05/2007 पासुन (14 वर्षे) | 29/05/2007 पासुन वैद्यकीय अधिकारी | लागु नाही | लागु नाही | जोडपत्र क सोबत जोडले आहे | लागु नाही |
| 3. | खुला | डॉ. बालनाथ चकोर | 3 | 16/01/1973 49 वर्षे | 31/01/2031 | एम.बी.बी.एस | नाही | 30/05/2007 पासुन (14 वर्षे) | 30/05/2007 पासुन वैद्यकीय अधिकारी | लागु नाही | लागु नाही | जोडपत्र क सोबत जोडले आहे | लागु नाही |

- विचारक्षेत्रातील खालील वैद्यकीय अधिकारी यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | जात पडताळणी आहे/नाही |
|---|---|---|
| 1. | डॉ.चंद्रशेखर कांबळे | आहे |

- विचारक्षेत्रातील खालील वैद्यकीय अधिकारी यांनी संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर केले आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | डॉ.चंद्रशेखर कांबळे |
| 2. | डॉ.प्रमोद पडवळ |

| | |
|---|---|
| 3. | डॉ.बालनाथ चकोर |

➢ विचारक्षेत्रात खालील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी परिविक्षाधीन कालावधी समधानकारकरित्या पूर्ण केला असल्याने त्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्यात आला आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | डॉ.चंद्रशेखर कांबळे |
| 2. | डॉ.प्रमोद पडवळ |
| 3. | डॉ.बालनाथ चकोर |

➢ विचारक्षेत्रातील कार्यरत असलेल्या खालील वैद्यकीय अधिकाऱ्यांविरुध्द कोणत्याही प्रकारची चौकशी सुरु नाही.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | डॉ.चंद्रशेखर कांबळे |
| 2. | डॉ.प्रमोद पडवळ |
| 3. | डॉ.बालनाथ चकोर |

1. विचारक्षेत्रातील खालील वैद्यकीय अधिकारी हे दिव्यांग अधिकारी नाहीत.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | डॉ.चंद्रशेखर कांबळे |
| 2. | डॉ.प्रमोद पडवळ |
| 3. | डॉ.बालनाथ चकोर |

➢ विचारक्षेत्रातील डॉ.चंद्रशेखर कांबळे, डॉ.प्रमोद पडवळ व डॉ.बालनाथ चकोर यांना जा.क्र मनपा/आस्था/1620/2021-22, दि.01/11/2021 अन्वये स्थायित्व प्रमाणपत्र दिलेले आहे.

➢ विचारक्षेत्रातील डॉ.चंद्रशेखर कांबळे, डॉ.प्रमोद पडवळ व डॉ.बालनाथ चकोर यांना जा.क्र. मनपा/आस्था/1624/2021-22, दि.01/11/2021 अन्वये हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणेमधुन सुट देण्यात आली आहे.

➢ विचारक्षेत्रातील डॉ.चंद्रशेखर कांबळे, डॉ.प्रमोद पडवळ व डॉ.बालनाथ चकोर यांना जा.क्र.मनपा/आस्था/1622/2021-22, दि.01/11/2021 अन्वये मराठी एदर्थ मंडळाची भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्यात आलेली आहे.

➢ विचारक्षेत्रातील खालील वैद्यकीय अधिकारी या संवर्गाची सन 2020 च्या अंतिम सेवा ज्येष्ठता यादीनुसार ज्येष्ठता क्रम खालीलप्रमाणे

| अ.क्र. | ज्येष्ठता क्रमांक | अधिकाऱ्याचे नाव | अभिप्राय |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | 1 | डॉ.चंद्रशेखर कांबळे | |
| 2. | 2 | डॉ.प्रमोद पडवळ | |
| 3. | 3 | डॉ.बालनाथ चकोर | |

2. विचारक्षेत्रातील खालील अधिकारी यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 नुसार आरोग्य अधिकारी(रुग्णालय/ प्रतिबंधात्मक उपाय)/शहर क्षयरोग अधिकारी/माता व बाल कल्याण अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यासाठी वैद्यकीय अधिकारी या पदाचा 03 वर्षाचा अनुभव धारण केलेला आहे. परंतू पदव्युत्तर पदवी (M.D) धारण केलेली नाही त्यामुळे खालील अधिकारी यांना शहर क्षयरोग अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यासाठी सद्यस्थितीत विचार करता येणार नाही.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | डॉ.चंद्रशेखर कांबळे |
| 2. | डॉ.बालनाथ चकोर |

3. त्याअनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर आरोग्य अधिकारी(रुग्णालय/ प्रतिबंधात्मक उपाय)/शहर क्षयरोग अधिकारी/माता व बाल कल्याण अधिकारी पद पदोन्नतीने भरावयाचे असल्यामुळे खालील वैद्यकीय अधिकारी यांनी आरोग्य अधिकारी(रुग्णालय/ प्रतिबंधात्मक उपाय)/शहर क्षयरोग अधिकारी/माता व बाल कल्याण अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यासाठी वैद्यकीय अधिकारी या पदाचा 03 वर्षाचा अनुभव धारण केलेला आहे. व पदव्युत्तर पदवी (M.D) धारण केलेली आहे. त्यामुळे रिक्त पदावर खालील वैद्यकीय अधिकारी यांना आरोग्य अधिकारी(रुग्णालय/प्रतिबंधात्मक उपाय)/शहर क्षयरोग अधिकारी/माता व बाल कल्याण अधिकारी या पदापैकी एका पदावर मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 च्या अधिन राहुन व मा.महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेस शिफारस आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | डॉ. प्रमोद पडवळ |

**4.** मिरा भाईदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 मधील अनुक्रमांक 6 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 अंतर्गत येणारी तसेच इतर गट-अ ची पदे पदोन्नतीने भरताना, त्यास शासनाची पुर्वमंजुरी आवश्यक राहील अशी तरतुद आहे. त्यामुळे मा.महासभा व शासन मान्यतेच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात आरोग्य अधिकारी(रुग्णालय/ प्रतिबंधात्मक उपाय)/शहर क्षयरोग अधिकारी/माता व बाल कल्याण अधिकारी या पदापैकी एका पदावर पदोन्नती देणेबाबत विभागाची शिफारस आहे.

## विभागीय पदोन्नती निवड समितीचा निर्णय :-

सदर प्रस्तावाचे वाचन करुन समितीने खालील अटीशर्तीच्या अधिन राहुन परिशिष्ट "अ" मधील खालील वैद्यकीय अधिकारी (वर्ग-01) यांना आरोग्य अधिकारी(रुग्णालय/ प्रतिबंधात्मक उपाय)/शहर क्षयरोग अधिकारी/माता व बाल कल्याण अधिकारी (वर्ग-01) या पदापैकी एका पदावर निव्वळ तात्पुरत्या पदोन्नती देणेकरीता निर्णय घेण्यात आला .

1. विचारक्षेत्रातील खालील अधिकारी यांनी मिरा भाईदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 नुसार आरोग्य अधिकारी(रुग्णालय/ प्रतिबंधात्मक उपाय)/शहर क्षयरोग अधिकारी/माता व बाल कल्याण अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यासाठी वैद्यकीय अधिकारी या पदाचा 03 वर्षाचा अनुभव धारण केलेला आहे. परंतू पदव्युत्तर पदवी (M.D) धारण केलेली नाही. त्यामुळे खालील अधिकारी यांना पदोन्नती देण्यासाठी अपात्र ठरविण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | डॉ.चंद्रशेखर कांबळे |
| 2. | डॉ.बालनाथ चकोर |

2. मिरा भाईदर महानगरपालिका आस्थापनेवर आरोग्य अधिकारी(रुग्णालय/ प्रतिबंधात्मक उपाय)/शहर क्षयरोग अधिकारी/माता व बाल कल्याण अधिकारी पद पदोन्नतीने भरावयाचे असल्यामुळे खालील वैद्यकीय अधिकारी यांनी आरोग्य अधिकारी(रुग्णालय/ प्रतिबंधात्मक उपाय)/शहर क्षयरोग अधिकारी/माता व बाल कल्याण अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यासाठी वैद्यकीय अधिकारी या पदाचा 03 वर्षाचा अनुभव धारण केलेला आहे. व पदव्युत्तर पदवी (M.D) धारण केलेली आहे. त्यामुळे रिक्त पदावर खालील वैद्यकीय अधिकारी यांना माता व बाल कल्याण अधिकारी या पदावर मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.28306/2017 च्या अधिन राहुन व मा.महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेकरीता निवड करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|
| 1. | डॉ. प्रमोद पडवळ |

3. मिरा भाईदर महानगरपालिका सुधारीत सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम-2019 मधील अनुक्रमांक 6 नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 45 अंतर्गत येणारी तसेच इतर गट-अ ची पदे पदोन्नतीने भरताना, त्यास शासनाची पुर्वमंजुरी आवश्यक राहील अशी तरतुद आहे. त्यामुळे सदर अधिकाऱ्यास शासन मान्यतेच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात माता व बाल कल्याण अधिकारी या पदावर पदोन्नती देणेकरीता निवड करण्यात येत आहे.
4. सदर पदोन्नती मा.महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.
5. सदर अधिकारी यांची शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे पडताळणीच्या तसेच सेवा व वेतन पडताळणीच्या अधिन राहुन लाभ मंजुर करण्यात येत आहे. वेतन निश्चितीनंतर वेतन पडताळणी पथकाकडुन त्याची पडताळणी करुन घेणेत यावी.
6. सदर अधिकाऱ्याला पदोन्नतीच्या अटीशर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र घेण्यात यावे,
7. कोणत्याही मा.न्यायालयाचा निर्णय संबंधीत अधिकारी यांचेवर बंधनकारक राहील.
8. सदर अधिकाऱ्यांना मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.28306/2017 वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून सेवाजेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देणेबाबत पदोन्नती समिती शिफारस करीत आहे.

(मारुती गायकवाड)
उपायुक्त (मुख्यालय) तथा सदस्य सचिव
विभागीय पदोन्नती निवड समिती

(दिपक खांबीत)
कार्यकारी अभियंता तथा मागासवर्गीय
प्रतिनिधी
विभागीय पदोन्नती निवड समिती

(मंजिरी डिमेलो)
प्र.मुख्यलेखापरीक्षक तथा सदस्य
विभागीय पदोन्नती निवड समिती

(दिलीप ढोले)
आयुक्त तथा अध्यक्ष
विभागीय पदोन्नती निवड समिती

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.

दुरध्वनी क्र. 28192828/28193087.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/593 /2022-23 दि.14/06/2022

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांना माता व बाल कल्याण अधिकारी या पदावर पदोन्नती देणेबाबत.

संदर्भ :-
1. जा.क्र.मनपा/सा.प्र./1489/2015, दि.16/12/2015 रोजीचा आदेश.
2. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक - मिभाम-1116/प्र.क्र.36 (भाग-1)/16/नवि-28, दि.26/02/2019.
3. नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक - मिभाम-1116/प्र.क्र.35/16/नवि-28, दि.28/05/2019.
4. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- एसआरव्ही 2018/प्र.क्र.159/कार्यासन 12, दि. 01/08/2019.
5. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.बीसीसी 2018/प्र.क्र.366/16-ब, दि.07 मे 2021.
6. नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्रमांक मिभाम-1116/प्र.क्र.35/नवि-28, दि.25 नोव्हेंबर, 2021.
7. मा.विभागीय पदोन्नती निवड समितीच्या बैठकीचे इतिवृत्तांत दि.31/03/2022.

## आदेश

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी या संवर्गातील अधिकारी यांना पदोन्नती देणेबाबत संदर्भ क्र.07 नुसार पदोन्नती समितीने शिफारस केली आहे. त्यानुसार उपरोक्त संदर्भ क्र.02 ते 06 वरील शासन निर्णयास अनुसरुन वैद्यकीय अधिकारी या संवर्गातील खालील अधिकारी यांना सेवाजेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटीशर्तीच्या अधिन राहून आदेशाच्या दिनांकापासुन पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव व वेतनश्रेणी | सद्याचे पद | पदोन्नतीचे पद | नेमणूक प्रवर्ग | पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | डॉ. प्रमोद पडवळ<br>S-20 56100-177500 | वैद्यकीय अधिकारी | माता व बाल कल्याण अधिकारी | खुला | S-23 67700-208700 |

अटीशर्ती :-

1. मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्रमांक 28306/2017 तसेच दि.07/05/2021 च्या शासन निर्णयाप्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुबंई येथे दाखल केलेल्या याचिकेवरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.
2. सदर पदोन्नती मा.महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.
3. सदर पदोन्नती शासन मान्यतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.
4. पदोन्नत अधिकाऱ्याने पदोन्नती नाकारल्यास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, एसआरव्ही-2015/प्र.क्र.303/कार्या-12, दि.12/09/2016 मधील तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात येईल.

5. सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना नियमीतपणाचा कोणताही हक्क मिळणार नाही.
6. सद्य:स्थितीत वैद्यकीय अधिकारी या पदाच्या ज्येष्ठता यादीबाबत कोणतेही न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नाही तसेच या ज्येष्ठता यादीस आव्हानित देखील करण्यात आलेले नाही ही वस्तुस्थिती विचारात घेऊन पदोन्नती देण्यात येत आहे.
7. माता व बाल कल्याण अधिकारी या पदावरील पदोन्नती ही त्यांच्या विरुध्द प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरू झालेली नाही वा प्रस्तावित नाही या धारणेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.
8. उपरोक्त नमुद अधिकाऱ्यांनी पदोन्नतीने नियुक्तीचे आदेश प्राप्त होताच 07 दिवसात अथवा निम्नस्वाक्षरीत मंजूर करतील अशा वाढीव मुदतीत पदोन्नतीच्या पदावर हजर व्हावे. तसेच पदभार स्विकारुन त्याबाबतचा अहवाल प्रशासनास तात्काळ सादर करावा. त्याचप्रमाणे विहित मुदतीत पदोन्नतीच्या पदावर हजर न झाल्यास अथवा पदोन्नती न स्विकारल्यास पदोन्नती आपोआप रद्द होईल. तसेच सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :- एसआरव्ही-1087/1131/प्र.क्र.11-89/बारा, दि.30 एप्रिल, 1991 मधील तरतुदीनुसार त्यांचे नाव निवडयादीतून काढून टाकण्यात येईल.
9. या आदेशान्वये पदोन्नती देण्यात येत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी पदग्रहण केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत वेतननिश्चितीचा विकल्प द्यावा. असा विकल्प न दिल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम,1981 मधील नियम 11(1)(ए) व महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, 2009 मधील नियम 13(अ)(1)(2)(ब) (1 व 2) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन त्यांची वेतननिश्चिती करण्यात येईल.
10. यासंदर्भात कोणताही शासन निर्णय/परिपत्रक/आदेश/कायदा/मा.न्यायालयीन आदेश/नियमातील सुधारणा इत्यादीमुळे आवश्यक असतील त्याबाबतीत सदर आदेश रद्द करणे/सुधारीत आदेश काढणे याबाबतचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे राखुन ठेवण्यात येत आहेत.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्त्व
1. अतिरिक्त आयुक्त (1/2)
2. उपायुक्त (सर्व)
3. मुख्यलेखापरीक्षक
4. मुख्यलेखाधिकारी
5. संबंधीत विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख
6. संबंधितांस
7. आस्थापना निवडनस्ती